# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 07/06/2021 (सोमवार)

(दुपार)

---

### फसवणुक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर गणेश नगर कन्हान येथे दिनांक 28/05/2020 चे 14.37 ते 14.50 वा. दरम्यान फिर्यादी नामे– निरज भासकर बागडे वय 45 वर्ष, रा. गणेश नगर, कन्हान यांच्या मोबाईल फोन वर त्याचे सिम बंद होणार आहे असा मॅसेज आला. त्यावरूण फिर्यादीने मॅसेज मध्ये नमुद असलेल्या मोबाईल क्रमांकावर कॉल केला असता त्यांनी सांगितले की, ''सिमकार्ड ची केवाय सी करायची आहे, आम्ही जे प्रोसिजर सांगतो तसे तुम्ही करा'' असे सांगुन फिर्यादीस प्लेस्टोर वरूण ॲनीडेस्क नावाचा सॉफटवेअर डाउनलोड करावयास लावुन तेथील ऑयकॉन वर त्याचे मोबाईलचे समोरील 4 आकडे 9402 असे टाकावयास लावले असता फिर्यादीचे खात्यातुन 9,404/–रू. कपात झाले. फिर्यादीने परत आरोपीला कॉल करून कपात झाल्याबाबद विचारणा केली असता आरोपीने ''तुमचे पैसे परत येतील, तुम्हाला मी सांगितल्या प्रमाणे प्रोसिजर करावी लागेल'' असे बोलुन फिर्यादी कडुन परत तिच प्रोसिजर करून घेउन परत 9,404/–रू त्यांचे खात्यातुन कपात झाले असे एकुण कि. 18,808/–रू. ने फिर्यादीची आर्थिक फसवणुक झाली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री शेख मो न. 9403692766 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेडः– अंतर्गत 04 कि. मी. अंतरावर मौजा कुंभारी शिवार येथे दिनांक 06/06/2021 चे 14.15 वा. पुर्वी अविनाश विजय लोखंडे(मृतक), वय 22 वर्ष, रा. ईतवारीपेठ, उमरेड हा मदन स्कुटर सेंट्रल बॅक एटीएम जवळ उमरेड येथे मोटरसायकल दुरूस्तीचे काम करीत होता. मृतकाने अज्ञात कारणातुन कुंभारी शिवारातील शेतात विषारी औषध प्राशन करून मृत अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजय पुंडलिक लोखंडे, वय 52 वर्ष, रा. ईतवारीपेठ उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक भोजराज झाडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर